# University of Mumbai


तातडीचे/अति महत्वाचे

दुरध्वनी क्र. ०२२-६८३२ ००५२

Email : supt.statunit@gmail.com

शैक्षणिक नियुक्त्या व गुणवत्ता हमी
(सांख्यिकी कक्ष),
खोली क्र. २०२, दुसरा मजला,
मुंबई विद्यापीठ, फोर्ट,
महात्मा गांधी मार्ग,
मुंबई- ४०० ०३२.


**No. AAQA/ICD/2022-23/1637 of 2023**

**विषय : माहिती व्यवस्थापन प्रणाली (DHE-MIS) शैक्षणिक वर्ष २०२२-२३ या वर्षाची माहिती नोंदविणेबाबत. (www.dhemis.maharashtra.gov.in)**

**संदर्भ : मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र शासन, पुणे यांचे क्र.उशिस/सांख्यिकी/एमआयएस/२०२२-२३/३५२७, दिनांक १७/०३/२०२३ रोजीचे पत्र.**

---

परिपत्रक :-

मुंबई विद्यापीठ संलग्नित/मान्यताप्राप्त सर्व कला, विज्ञान, वाणिज्य, शिक्षणशास्त्र व विधी महाविद्यालये/संस्था यांचे प्राचार्य/संचालक तसेच समन्वयक, विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श महाविद्यालय, आंबडवे, ता. मंडणगड, जिल्हा रत्नागिरी व विजयालक्ष्मी विश्वनाथ दळवी आदर्श महाविद्यालय, तळेरे, ता. कणकवली, जि. सिंधुदूर्ग यांचे लक्ष उपरोक्त नमुद विषयाबाबतचे मा. संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र शासन यांचेकडून प्राप्त झालेल्या संदर्भीय पत्राकडे वेधण्यात येत आहे (प्रत संलग्न). सदर पत्रान्वये माननीय संचालकांनी असे कळविलेले आहे की, उच्च शिक्षण संचालनालयाने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ या वर्षाच्या माहिती नोंदणीची वेबलिंक www.dhemis.maharashtra.gov.in **दिनांक १६ मार्च, २०२३** पासून उपलब्ध करून दिलेली असून **दिनांक ३० सप्टेंबर, २०२२ या संदर्भ दिवसाची प्रशासकीय, शैक्षणिक व शैक्षणिकेतर बाबींची माहिती** आपल्या महाविद्यालयाकडून नोंदविण्यासाठीचे संबधित काम **दिनांक २० एप्रिल, २०२३** अखेर निश्चितपणे पुर्ण करावयाचे असून कोणत्याही प्रकारची मुदतवाढ देण्यात येणार नाही, असे संचालनालयाच्या संदर्भीय पत्रानुसार कळविण्यात आलेले आहे. त्यानुसार **उल्लेखित वेबपोर्टलवर माहिती ऑनलाईन नोंदणीचे व त्यानंतर नोंदविलेल्या माहितीची वैधता पडताळणी करून त्याबाबतचे प्रमाणपत्र/हमीपत्र महाविद्यालयांनी सदर विभागाकडून बुधवार, दिनांक ५ एप्रिल, २०२३ पर्यंत विनाविलंब सादर करणे अनिवार्य आहे. कारण विद्यापीठास संचालनालयामार्फत शासनास सादर करण्याच्या व कार्यालयीन कामाची योग्य ती कार्यवाही पुर्ण करण्याच्या हेतूने संबंधित कामकाजाविषयी आढावा घेण्यास तसेच आवश्यक तेथे दुरूस्तीचे काम करणे सोईचे होईल.**

**DHE-MIS - माहिती व्यवस्थापन प्रणाली :-**

त्याचप्रमाणे आपल्या महाविद्यालय/संस्थेमार्फत भरण्यात आलेल्या ऑनलाईन माहितीमध्ये पुढीलप्रमाणे नमुद ब-याचश्या/काही त्रुटी संचालनालयाच्या निदर्शनास आलेल्या आहेत.

१. माहिती नोंदणी करताना काही महाविद्यालये विशेषतः विनाअनुदानित महाविद्यालये प्रणाली मधील सर्व मॉडयूल्सची माहिती भरत नसल्याचे आढळले आहे. मॉडयूल्स मधील विशेषतः विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांची माहिती व्यवस्थितपणे व पुर्णपणे भरली जात नाही.

२. माहिती भरताना नोंदणीकृत विद्यार्थ्यांची संख्या उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या संख्येपेक्षा जास्त दर्शविण्यात येते. तसेच नोंदणीकृत विद्यार्थ्यांची संख्या दर्शविली जात नाही, केवळ उत्तीर्ण विद्यार्थ्यांची संख्या दर्शविली जाते.

३. शासकीय/अनुदानित/अंशतः अनुदानित/विनाअनुदानित/ग्रामीण/शहरी/आदिवासी/केवळ मुलींकरीता/अल्पसंख्यांकांचे महाविद्यालये (भाषिक/धार्मिक) याबाबतचे वर्गीकरण महाविद्यालयामार्फत व्यवस्थितरित्या प्रणालीमध्ये दर्शविले जात नाही. त्यामुळे वरील बाबींच्या राज्य स्तरावरील एकूण आकडेवारीमध्ये तफावत आढळून येते.

कृ.मा.प.

उपरोल्लेखित सर्व बाबींचा विचार करता प्राचार्य/संचालक यांच्या असे निदर्शनास आणून देण्यात येते की, सर्वेक्षणाद्वारे शासनास उपलब्ध असलेली विविध प्रशासकीय, शैक्षणिक व शैक्षणिकेतर बाबींची महत्वपुर्ण माहिती ही उपलब्ध असलेल्या विवरण पत्रानुसार ऑनलाईन स्वरूपात नोडल अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून परिपुर्ण नोंदविली गेली आहे याची पडताळणी करावी. पडताळणी केलेल्या माहितीमध्ये विसंगती/त्रुटी आढळल्यास सर्वस्वी जबाबदारी आपली राहील, तसेच कोणतीही विद्यापीठीय कार्यालयीन कार्यवाहीची पुर्तता (उदा. संलग्नीकरण, परीक्षानिकाल विद्यार्थ्यांचे नोंदणी/पात्रता अर्ज व अनुषंगिक कामे) हमीपत्र/प्रमाणपत्राविना करता येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

वेबपोर्टलवर अद्याप नोंदणी झाली नसलेल्या माहविद्यालयांकरीता :-

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ या वर्षात नव्याने संलग्नित असलेल्या तथापि वेबपोर्टलवर अद्याप नोंदणी झाली नसलेल्या महाविद्यालयांनी दिनांक २५/०३/२०२३ पुर्वी सदर विभागास संपर्क साधून वेबपोर्टलवर नोंदणी करून घेण्यात यावी. तसेच दिनांक २५/०३/२०२३ नंतर कोणत्याही महाविद्यालयाचे नाव प्रणालीमध्ये समाविष्ट करण्यात येणार नाही व याची सर्वस्वी जबाबदारी प्राचार्य/संचालक यांची राहील, याची नोंद घ्यावी.

सर्वेक्षण कार्यक्रमाच्या माध्यमातून ऑनलाईन स्वरूपातील माहिती विवरण पत्रामध्ये भरण्याबाबत आपणास काही समस्या/अडचणी उद्भवल्यास खालील दिलेल्या रकान्यातील अधिका-यांना संर्पक साधावा.

| Contact Person | Office Address | Land Line No. | Email ID |
|---|---|---|---|
| Mr. Aqueel Shaikh<br>Nodal Officer<br>(AISHE/MIS Cell) | University of Mumbai,<br>Academic Appointments &<br>Quality Assurance<br>(Statistical Cell)<br>Room No. 202, Fort,<br>Mumbai- 400 032. | Landline : 022-6832 0052<br>Mobile : 77150 26409<br>99678 30061<br>98334 17879 | supt.statunit@gmail.com |

(प्रा. सुनिल भिरूड)
प्रभारी कुलसचिव

मुंबई - ४०० ०३२
दिनांक : १८ मार्च, २०२३

University of Mumbai



(अ) प्रत माहिती करीता सविनय सादर :-

१. मा. संचालक, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण), मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.
२. मा. सहसंचालक, (उच्च शिक्षण), मुंबई विभाग, ३ महापालिका मार्ग, मुंबई-४००००१
३. मा. सहसंचालक, (उच्च शिक्षण), कोकण विभाग, पनवेल, जि. रायगड -४१०२०६.
४.

(ब) प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरीता :-

१. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, परीक्षा विभाग, मुबंई विद्यापीठ, विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई-४०००९८.
२. उपकुलसचिव, संलग्नता विभाग, मुबंई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई-४०००३२.
३. उपकुलसचिव, घटक महाविद्यालये, मुबंई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई-४०००३२.
४. उपकुलसचिव, पदव्युत्तर विभाग, मुबंई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई-४०००३२.
५. उपकुलसचिव, विशेष कक्ष, मुबंई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई-४०००३२.
६. उपकुलसचिव, पात्रता/नाव नोंदणी विभाग, मुबंई विद्यापीठ, विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई-४०००९८.
७. उपकुलसचिव, रत्नागिरी उपकेंद्र, पी-६१, MIDC, मिरजोळे, रत्नागिरी - ४१५६३९.
९. सहायक कुलसचिव, शिक्षक नियुक्ती विभाग, मुबंई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई-४०००३२
१०. सहायक कुलसचिव, ठाणे उपकेंद्र, मुबंई विद्यापीठ, ठाणे-४०० ६०८.
११. सहायक कुलसचिव, कल्याण उपकेंद्र, मुबंई विद्यापीठ, कल्याण.
१२. अधिक्षक, आवक विभाग, मुबंई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई-४०००३२.
१३. अधिक्षक, आवक विभाग, मुबंई विद्यापीठ, विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई-४०००३२.

**आपणांस कळविण्यात येते की, MIS शैक्षणिक वर्ष २०२२-२३ बाबतची माहिती विद्यापीठ विभाग व संलग्न महाविद्यालये/संस्था यांनी भरणे अनिवार्य असून ती न भरल्यास विद्यापीठ विभाग व महाविद्यालय/संस्था यांच्या विद्यार्थ्यांचे नोंदणी/पात्रता अर्ज (Enrollment/EligibilityForm), महाविद्यालयाची संलग्नता (Continuation/Extension)/प्राचार्य/ शिक्षकमान्यता (Approval) परिक्षा अर्ज (Exam.Form) व महाविद्यालये/संस्थांचे कोणतेही पत्रव्यवहार स्विकारू नयेत. तसेच जाहिरात, मसुदा, बिदुंनामावली तपासणी करू नयेत. त्याचप्रमाणे प्रत्येक विद्यापीठ विभाग/संलग्न महाविद्यालये/संस्थेकडून त्याबाबतच्या प्रमाणपत्राची छायांकित प्रत संबंधितांकडून घेण्यात यावी व त्यानंतरच पुढील योग्य ती कार्यालयीन कार्यवाही करण्यात यावी, असे आदेश मा. शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे व मा. कुलगुरू, मुंबई विद्यापीठ, यांनी दिलेले आहेत, याची आपण प्रमुख या नात्याने गांभीर्याने नोंद घ्यावी.**

मुंबई - ४०० ०३२
दिनांक : १८ मार्च, २०२३

(प्रा. सुनिल भिरूड)
प्रभारी कुलसचिव

# मुंबई विद्यापीठ
## शैक्षणिक नियुक्त्या व गुणवत्ता हमी (सांख्यिकी कक्ष)
## माहिती व्यवस्थापन प्रणाली (MIS)
## शैक्षणिक वर्ष : २०२२-२३

### -: प्रमाणपत्र :-

**महाविद्यालयाचे नाव व पत्ता :** ____________________

____________________

____________________

**दुरध्वनी क्र. :** ____________________

**ईमेल आयडी :** ____________________

असे प्रमाणित करण्यात येते की, **शैक्षणिक वर्षे २०२२-२३** बाबतची **माहिती व्यवस्थापन प्रणाली (MIS)** या वेबपोर्टलवर वरील महाविद्यालयाची शैक्षणिक व शैक्षणिकेतर बाबींची सर्व माहिती वेबपोर्टलवर नोंदविली आहे. **सदरील माहितीची पडताळणी करण्यात आली असून ती बरोबर व वैध असल्याचे आढळून आले आहे. त्याबाबत काही त्रुटी आढळल्यास महाविद्यालयीन प्रमुख या नात्याने सर्वस्वी जबाबदारी माझी राहील, याची मी ग्वाही देतो/देते.**

दिनांक :

ठिकाण :

(स्वाक्षरी)

**प्राचार्य**

**महाविद्यालयाचे नाव व सील**

---

(कार्यालयीन कामकाजाकरीता)

### -: ना-हरकत प्रमाणपत्र :-

प्रमाणित करण्यात येते की, **माहिती व्यवस्थापन प्रणाली (MIS)** बाबतची **शैक्षणिक वर्षे २०२२-२३** ची माहिती वेबपोर्टलवर ____________________

____________________ या

____________________ महाविद्यालयाची शैक्षणिक व शैक्षणिकेतर बाबींची सर्व माहिती नोंदविली आहे. सदर महाविद्यालयाकडे MIS बाबतची कोणतीही माहिती प्रलंबित नाही. सबब सदरील महाविद्यालयाची कार्यालयीन कामे विद्यापीठाच्या संबंधित शाखेकडून पुढील कार्यवाहीकरीता स्विकारण्यास हरकत नाही.

(अकील अं. शेख)
नोडल अधिकारी
**(AISHE/MIS Cell)**
**Academic Appointments &**
**Quality Assurance**

दिनांक :

ठिकाण :